दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ३८ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.२६ ऑक्टोबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# माता महाकालीच्या पालखी दर्शना साठी उसळला भक्तीचा महासागर

## नगर प्रदक्षिणा पालखीने पाच दिवशीय महोत्सवाचा समारोप






**चंद्रपूर । प्रतिनिधी**

श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने आयोजित पाच दिवसीय श्री माता महाकाली महोत्सवाचा समारोप झाला आहे. यावेळी निघालेल्या माता महाकालीच्या पालखी दर्शनासाठी मार्गावर भक्तीचा महासागर उसळला होता. यानगरप्रदक्षिनेत सादर करण्यात आलेल्याविविध देखाव्यांनी चंद्रपूरकरांचे लक्ष वेधून घेतले.

सायंकाळी पाच वाजता महाकाली मंदिर जवळूननगरप्रदक्षिणापालखीला सुरवात झाली. तत्पूर्वी चार दिवस महाकाली मंदिर जवळील पटांगणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले,यात धार्मीक, सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रमांचा समावेश होता. सदर कार्यक्रम पाहण्यासाठीही मातेच्या भक्तांची मोठी गर्दी केली होती. या दरम्यान९हजार९९९कन्यांचे कन्यापूजन आणिकन्याभोजन करण्यात आले. तर११हजार१११दिवे प्रज्वलीत करत परिसर लखलख करण्यात आला. नवरात्रो दरम्यान जन्मलेल्या कन्यांच्या पालकांना महोत्सव समीतीच्या वतीने चांदिचे नाणे देण्यात आले. तर२३ऑक्टोंबरला सायंकाळी पाच वजात श्री माता महाकाली नगरप्रदक्षिणा पालखीला प्रारंभ झाला. यात या पालखी यात्रेत मंदिर अब बनने लगा है या गाण्याची सुप्रसिध्द गायीका ईशरत जॅहा यांच्या रोड शो ने शोभायोत रंगत भरली. सोबतच यात केदारनाथ धाम येथील झांज व डमरु पथक,पवनसुत हनुमान व वानरसेना,कानपूर येथील शिवतांडव व अघोरी नृत्य,उत्तर प्रदेश राज्यातील काली माता दृष्य,आदिवासी नृत्य,गंगा आरती,पालखीत तुतारी व अब्दारीचा समावेश,पालखीत पोतराजे नृत्य यांचा समावेश,चंद्रपूर शहरातील ८० वादकांचा जगदंब व अन्य ढोल ताशा व ध्वज पथकांचा समावेश,शहरातील बँड पथकांचा समावेश,पालखीत गायत्री मंदिर परिवारातील ५०० कलशधारी महिलांचा समावेश,पालखीत ५०० महिला व पुरुषांचे लेझीम पथक,डी. जे. धुमालचे विविध संच,शाळा,कॉलेज मधील विद्यार्थी- विद्याथ्र्याचे दृष्य समूह,डी. जे. चे विविध संच,महिला,पुरुषांचे दांडिया गरबा नृत्य समूह,१००९ महिला - पुरुषांचे योग नृत्य,१५१ मंडळांचे महिला - पुरुषांचे भजन समूह,नागपूर येथील विरांगण क्रीडा गृपच्या मुलांचे शस्त्र प्रात्यक्षिक,शहरातील अनेक सामाजिक संघटनांचा पालखीत सहभाग,शहरातील व्यायाम शाळांचा पालखीत सहभाग,छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आधारित दृष्य समूह, चंद्रपूर जिल्ह्यातील देवी - देवतांच्या मंदिराचे दृष्य,श्री माता निर्मला परमेश्वरी भक्तांचा पालखीत समावेश,पारंपरिक खेळांचे पालखीत दृष्य,तेलगु समाजाचे बतुकम्मा दृष्य,पारंपारिक सण उत्सवांचे बोलके दृष्य,शहारातील तंट्या बिल व वाघोबांचा समावेश,मशाल पथक यांचा पालखीत समावेश,टांगता रोप मल्लखांब प्रात्यक्षिक समूह, स्थिर मल्लखांब प्रात्यक्षिक समूह,जोगदंड महाराज वारकरी शिक्षण संस्था,पंढरपूर यांचे १०८ वारकरी टाळ,मृदुंग,गर्जना समुह,स्वच्छता समूह यांचा पालखीत समावेश,बंगाली समाजातील महिलांद्वारा शंखनाद व पुरुषांद्वारा डंकनाद आदींचा समावेश होता.नगरप्रदक्षिणायात्रेत वाराणसीहून सहभागी झालेल्या पंडीतांनी गंगा आरती केली. यावेळी करण्यात आलेल्या गंगा आरतीने भाविकांचे लक्ष वेधून घेतले. गंगा आरती पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी गंगा आरतीमुळे धार्मीक वातावरण निर्माण झाले.पाच दिवस चाललेल्या कार्यक्रमात निशा बोनगीरवार - पडगीलवार,जयश्री कापसे - गांवडे यांनी मंचाची व्यवस्था उत्तमरित्या सांभाडली तर अल्का ठाकरे,श्याम हेडाऊ,सुलक्षणा गायकवाड,ज्योती गावंडे,मृणालीनी खाडीलकर,रजनी पॉल,सुमेधा श्रीरामे,स्वप्नील मेश्राम,धन्वरषा नागोसे,सरोज चांदेकर,एकता पित्तुलवार,अर्चनाचौधरी,जगदीश नंदुरकर,प्रज्ञा जिवणकर,राजश्री मार्कंडेवार,श्री झा,मकसुद,धनंजय तावाडे आदींची संचालन केले.

### महोत्सवातलाभलेला लोकसहभागउत्साह वाढविणारा - आ. किशोर जोरगेवार

**चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकालीचा जागर करण्यासाठी,महिला शक्तीला सन्मानित करण्यासाठी सोबतच चंद्रपूरातील पर्यटनाला चालना मिळावी या हेतुने आपण अयोजित केलेला श्री माता महाकाली महोत्सव चंद्रपूरकरांच्या प्रचंड प्रतिसादामूळे भव्यतेसह यशस्वी झाला आहे. महोत्सवाच्या या पाच दिवस आपण हजारोच्या संख्येने नोंदविलेला लक्षणीय सहभाग उत्साह वाढविणारा असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वितीने आयोजित श्री माता महाकाली महोत्सवाचे भव्य अशा नगरप्रदक्षिणापालखीने समारोप करण्यात आला आहे. यावेळी सदर भावना आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली आहे. ते म्हणाले कि,मागच्या वर्षी प्रथम वर्ष होता. मात्र त्यावेळी चंद्रपूकरांच्या लाभलेल्या सहभामुळेच आपण दुस-या वर्षीही हे आयोजन भव्यतेसह करु शकलो. आपल्या सहभागाशिवाय हा महोत्सव शक्य नव्हता. पूढच्या वर्षीही हाच उत्साह घेऊन आपण हा महोत्सव आयोजित करु आता हि परंपरा बनली असून दरवर्षीनवरात्रोमध्ये मातेची पालखी निघणार असा विश्वास त्यांनी यावेळी बोलुन दाखविला. या आयोजनासाठी सहकार्य करणा-या सर्व सेवाभावी संस्था,कार्यकर्ते,माता भक्तांचेही त्यांनी यावेळी आभार मानले.**

## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या एका मोहीमेमुळे

# १३ लाख ४५ हजार शेतकऱ्यांना पी एम किसान आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेचा लाभ मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी पी एम किसानचा पुढील हप्ता त्याचबरोबर राज्य शासनाने जाहीर केलेल्या नमो किसान महासन्मान योजनेचा पहिला हप्ता देण्याच्या पार्श्वभूमीवर पात्र लाभार्थी शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे तसेच अन्य अटींची पूर्तता करण्याबाबत ऑगस्ट महिन्यापासून विशेष मोहीम राज्य शासनामार्फत राबवली होती. या मोहिमेद्वारे राज्यातील १३ लाख ४५ हजार शेतकरी पी एम किसान आणि नमो शेतकरी महासन्मान योजनेसाठी कायमस्वरूपी पात्र ठरले आहेत.कृषी मंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतः पुढाकार घेऊन कृषी, महसूल, भूमी अभिलेख आदी विभागांचा समन्वय साधून ई-केवायसी पूर्ण करणे, भूमी अभिलेखाच्या नोंदी अद्ययावत करणे, आधार बँक खात्याशी संलग्न करणे आदी बाबींची पूर्तता करून घेत राज्यातील १३ लाख ४५ हजार शेतकरी या दोन्हीही योजनांच्या लाभास पात्र करवून घेतले आहेत.पी एम किसान योजना जेव्हा नव्याने सुरू करण्यात आली त्यावेळी राज्यातील सुमारे १ कोटी १९ लाख शेतकऱ्यांनी या योजनेत नोंदणी केली होती. त्यांपैकी सुमारे ९५ लाख शेतकरी पात्र ठरले.



मात्र वरील अटींची पूर्तता न केल्याने १३ व्या आणि १४ व्या हप्त्यात त्यापैकी ८५ लाख ६० हजार शेतकऱ्यांना पी एम किसानचा प्रत्यक्ष लाभ मिळाला. १५ व्या हप्त्यासाठी ई-केवायसीची अट आता अनिवार्य करण्यात आली आहे.मुळात ९५ लाख पैकी मयत, कर भरणारे व इतर कारणांनी रद्द करून ९२.८७ लाख शेतकरी पात्र ठरत आहेत. पण त्यांपैकी ८२.५९ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण झालेले होते.धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून कृषी विभागाने विशेष मोहीम हाती घेतल्यानंतर ग्राम पंचायत पदाधिकारी, कृषिमित्र, यांसह कर्मचाऱ्यांनी कॅम्प घेऊन, बांधावर जाऊन १३ लाख ४५ हजार शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रमाणीकरण, बँक खाते संलग्न करणे, भूमिअभिलेख नोंदी पूर्ण करून अद्ययावत करून घेणे या अटींची पूर्तता करून घेतली. यामध्ये ९.५८ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी पूर्ण करणे, २.५८ लाख शेतकऱ्यांचे खाते आधार संलग्न करणे, १.२९ लाख शेतकऱ्यांचे भूमिअभिलेख नोंदी अद्ययावत करणे बाबत कामकाज पूर्ण झाले आहे. याबाबत धनंजय मुंडे यांनी सातत्याने विभागाच्या बैठका घेऊन वारंवार आढावा घेतल्याने या कामाला आणखीनच गती प्राप्त झाली.

### शिर्डीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या हस्ते नमो किसान महासन्मान योजनेचा पहिला हप्ता होणार एका क्लिकवर वितरित

**दरम्यान राज्य शासनाने घोषित केलेल्या नमो किसान महासन्मान योजनेतून राज्यातील सुमारे ८६ लाख शेतकऱ्यांना २ हजार रुपये प्रमाणे पहिल्या हप्त्याचे गुरुवारी (दि.२६) रोजी शिर्डी येथे होणाऱ्या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एका क्लिकवर वितरण करण्यात येणार असून यासाठी कृषी विभागाने १७२० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे.**

# अंधश्रध्दाचे निमुर्लन झाले पाहिजे-डॉ.अंकुश आगलावे



**वरोरा । प्रतिनिधी**

समाजातुन अंधश्रध्दाचे निमुर्लन झाले पाहिजे असल्याचे प्रतिपादन गुरूदेव प्रचारक डॉ. अंकुश आगलावे यांनी आनंदवन चौक येथे छावा ग्रुप द्वारे आयोजित गरबा व दांडिया उत्सवा प्रसंगी केले. डॉ. आगलावे पुढे म्हणाले की शेतकरी शेतात कबाड कष्ट करून उत्पन्न मिळवितो हीच खरी लक्ष्मी आहे. समाजात आताही अनेक रूढी परंपरा आहे जी अंधश्रध्दाचे ग्रासलेले आहे. खरी विद्या तर पुस्तके वाचल्याने मिळते. डॉ. आगलावे म्हणाले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी अंधश्रध्दा व जातीभेद निर्मुलनासाठी भजन व किर्तनाचा वापर केला. छत्रपती शिवाजी महाराजानी अनेक लढाई अमावस्याचे रात्री करून शत्रुंवर विजय मिळविला परंतु आताही माता भगिनी अमावस्याला बाहेर निघु नये भुत पिशाच्च असते अशी बतावणी करतात ही केवळ अंधश्रध्दा असल्याचे डॉ. आगलावे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे आयोजन छावा ग्रुपच्या वतीने करण्यात आला. यावेळी छावा ग्रुपचे अध्यक्ष आकाश लीगाडे, उपाध्यक्ष निहाल मत्ते, सचिव समीर देठे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत स्कुल बॅगचे वितरण करण्यात आले. यावेळी छावा ग्रुपचे पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते तसेच या गरबा दांडिया उत्सवात अनेक युवक युवतीने सहभाग घेतला.

# ऑटोरिक्षा व्यवसायातून समाजसेवेचे व्रत स्वीकारावे- हंसराज अहीर

## ऑटोरिक्षा चालकांना गणवेशाचे वितरण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ऑटोरिक्षा व्यवसायातून कुटूंबियांचा उदरनिर्वाह करण्यापुरते किंवा प्रवाशांची सेवा एवढेच सिमीत कर्तव्य पार न पडता चंद्रपूर जिल्हा ऑटो चालक-मालक संघटनेतील ऑटोचालकांनी सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक कार्यातून आपल्या कर्तव्याला न्याय देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. एक जबाबदार नागरिक म्हणुन समाजाच्या हितासाठी त्यांचेही योगदान फार मोलाचे असल्याने ऑटोरिक्षा व्यवसायिकांनी व्यवसायाबरोबरच सामाजिक हितासाठी त्यांचेही योगदान फार मोलाचे असल्याने ऑटोरिक्षा व्यवसायिंनी व्यवसायाबरोबरच सामाजिक ऋणाची परतफेड करण्यास सदैव कार्यरत राहावे असे विचार राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी व्यक्त केले.

वियजादशमीच्या शुभमुहूर्तावर हंसराज अहीर यांनी दि. २४ ऑक्टोंबर रोजी आपल्या निवासस्थानी ऑटो चालक बांधवाना गणवेश वितरीत केले त्या प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजु घरोटे, भाजपा ओबीसी मोर्चाचे महानगर अध्यक्ष विनोद शेरकी, दामोधर मंत्री, ऑटो चालक-मालक संघटनेच संस्थापक राजेंद्र खांडेकर, जिल्हाध्यक्ष मधुकर राऊत, सचिव सुनिल धंदरे, जिल्हा संघटक सुनिल चन्ने, रवी आंबटकर, जनार्धन गुंजकर, अरविंद उमरे, अंकुश कौरासे, रमेश वझे, किशोर वाटेकर, वासुदेव कुबडे, मंगेश चवरे, महेश ढेकरे, विश्वास वैद्य, अब्दुल रहीम, विजय मडावी, सुनिल देऊळकर, गजान बाबर, वामन टोंगे, नासीर शेख, प्रदिप वरभे, शरद मेश्राम, युनुस शेख, शाकीर शेख, महादेव शेंडे यांचेसह आदींची उपस्थिती होती.

ऑटोरिक्षा हा व्यवसाय असला तरी हे क्षेत्र एकप्रकारे सेवेचे साधन आहे. समाजात अनेक ऑटो चालकांनी आपल्या सहृदयतेच्या वेळोवेळी परिचय दिला आहे. रंजल्या गांजल्यांना, वृध्दांना सेवा दिली आहे. अनेकांना मानवतेचे दर्शन घडविले आहे. हा धर्म त्यांनी मानत आपल्या सेवेला समाजाभिमुखतेची जोड द्यावी असे आवाहन अहीर यांनी केले. ऑटोरिक्षा चालकांच्या अडचणी त्यांचे प्रश्न त्यांच्या समोरील समस्या सोडविण्यासाठी आपण त्यांच्या पाठीशी कायम उभे राहु अशी भावनाही अहीर यांनी याप्रसंगी व्यक्त केली. विश्वास हा ऑटो व्यवसायींसाठी अलंकार असून तो ग्राहकांच्या नजरेतून ढळु न देण्याची काळजी ऑटो व्यवसायी बांधवांनी घ्यावी असेही ते म्हणाले.यावेळी हंसराज अहीर यांनी शहरातील ऑटोरिक्षा चालक बांधवांना गणवेशाचे वितरण केले त्यांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या.



# शिक्षण संस्थेचा वशीकरण प्रयोग?


**महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. पुरोगामी विचारवंतांची भूमी आहे. या महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी महात्मा ज्योतिराव फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांच्यासह अनेक थोर महात्मे होऊन गेले. सर्वांनी या महाराष्ट्रात आपापल्या परीने शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. शहाणे करून सोडावे सकल जन या म्हणीप्रमाणे सर्वांना शहाणे करण्याचा प्रयत्न ज्या भूमीवर ज्या थोर महात्म्यांनी केला. ज्या महाराष्ट्राने पुरोगामी म्हणून भारत देशात नेतृत्व केले. शैक्षणिक क्षेत्रात एक नावाजलेले राज्य म्हणून लौकिक कमावला. देशभरात प्रगतशील विचारांचे राज्य म्हणून महाराष्ट्राचे नाव देशात घेतले जाते. त्याच महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्ह्यातील एका शिक्षण संस्थेत सुरू असलेला अंतर्गत वाद चर्चेचा विषय झाला आहे. चर्चेचे कारणही मोठे मनोरंजक आहे.या संस्थेवर लोकशाही मार्गाने नव्हे तर अंधश्रद्धेच्या मार्गाने कब्जा मिळविण्याचा करण्यात आलेला तथाकथित प्रयत्न सध्या मनोरंजनाचा विषय झाला आहे.**




शैक्षणिक संस्था आपापल्या परीने आपल्या शिक्षण संस्थांना नामांकित करण्याचे प्रयत्न करीत असतात . विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी त्या झटत असतात. शिक्षण संस्थेचा लौकिक कसा वाढेल यासाठी प्रयत्नशील असतात. आपल्या शैक्षणिक संस्थेतून शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी या राज्याचे नाव मोठे केले पाहिजे असे त्यांना वाटते.मात्र अशी अपेक्षा असताना चंद्रपूर जिल्ह्यातील एक शैक्षणिक संस्था आगळ्यावेगळ्या विषयाने चर्चेत आली आहे. या जिल्ह्यातील एका नामांकित शिक्षण संस्थेच्या संचालकांमधील अंतर्गत वाद सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. संचालकांतील वाद इतका विकोपाला गेला आहे की, ती संस्था आपल्याच ताब्यात राहावी यासाठी निवडणूक प्रक्रिये दरम्यान संचालकांच्या एका गटाने दुसऱ्या गटातील संचालकांना आपल्याकडे वशीकरण करण्यासाठी त्यांच्या घरी हळद, कुंकू लावलेल्या वस्तू टाकण्यात आल्या असल्याची खमंग चर्चा ऐकायला मिळत आहे. घरात जादूटोणा सदरातील तथाकथित संशयास्पद वस्तू आढळून आल्याने संचालकातील एका गटात भीतीचे वातावरण पसरले असल्याचे बोलले जात आहे. या संस्थेतील सत्ता संघर्ष इतका विकोपाला गेला आहे की एका गटांनी ती संस्था आपल्याच ताब्यात राहण्यासाठी निवडणूक प्रक्रिया दरम्यान आपल्यालाच मते मिळावी यासाठी या महिन्यात ६ ते १० तारखे दरम्यान या संचालकांच्या घरी सोप्यामध्ये हळद कुंकू लावलेल्या वस्तू टाकण्यात आल्या. हा सगळा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये बंदिस्त झाला असल्याचे बोलले जाते. या वस्तूमध्ये धागे बांधलेल्या वस्तू आढळून आल्याने संचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे आपल्या जीविताला धोका तर होणार नाही ना? असा संशयही काहींच्या मनात निर्माण झाला असल्याचे सांगतात. नुकताच झालेला पितृपक्ष व त्याच काळात हा प्रकार घडल्याने संचालकांनी गांभीर्याने घेतले असल्याचे बोलले जात आहे.असे सांगितले जाते की, पितृपक्षांमध्ये जादूटोणा हा प्रकार प्रभावी ठरतो.या माध्यमातून या शैक्षणिक संस्थेवर आपली सत्ता काबीज करू इच्छिणाऱ्या दुसऱ्या गटांने त्यांना वशीकरण करण्याचा प्रकार केला असावा. शैक्षणिक संस्था आपल्या कब्जात घेण्यासाठी जादूटोण्यासारख्या भ्रामक क्लुप्तीचा वापर करणे ,प्रयत्न करणे म्हणजे शिक्षण क्षेत्रासाठी ही हास्यास्पद गोष्ट आहे. शिक्षण क्षेत्र हे विद्वानांचे असावे.विद्वानांचा आखाडा असायला पाहिजे. या क्षेत्रात संचालक मंडळ निवडताना ते विद्वत्ताप्रचुर असायला हवे. विद्यार्थ्यांना न्याय देणारे असले पाहिजे. शैक्षणिक संस्थेने प्रगती करावी, विस्तार करावा व विद्यार्थी हीत जोपासत संस्थेला कार्यरत ठेवावे अशी अपेक्षा असताना एखाद्या निरक्षर समूदायालाही लाजवेल अशाप्रकारे जादूटोणा, वशीकरण अशा भ्रामक कल्पनेचा वापर करीत शिक्षण संस्थेवर कब्जा मिळण्याचा केलेला तथाकथित प्रयत्न ही हास्यास्पद गोष्ट आहे. एकीकडे शैक्षणिक संस्था समाजाला दिशा देण्याचे नेतृत्व करतात. आणि दुसरीकडे संस्थाचालक समाजातील अंधश्रद्धाचा आधार घेऊन आपल्या भिकारवृत्तीचे प्रदर्शन करतात .यापेक्षा महाराष्ट्राला लाजवणारी नाचक्कीची गोष्ट कोणती? निदान शिक्षण क्षेत्रातील शिकलेल्या सवरलेल्या लोकांकडून तरी अशी अपेक्षा नाही. जगामध्ये जादूटोणा,वशीकरण वगैरे आहे की नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत विचाराचा भाग आहे. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी शासन आपल्यापरीने प्रयत्न करीत असते. त्यासाठी शासनाने जादूटोणा विरोधी कायदाही पास करून घेतला. अंधश्रद्धेच्या निर्मूलनार्थ प्रा. श्याम मानव, नरेंद्र दाभोळकर यांच्यासारख्या अनेक समाजसेवकांनी आपल्या जिवाचे रान केले आहे. लोकांना शहाणे करून सोडत आहे. त्याच महाराष्ट्रात चंद्रपूर जिल्ह्यातील नामांकित शिक्षण संस्थेतील हा कथीत वशीकरण प्रयोग हास्याचा विषय ठरला आहे.दिव्याखाली अंधार याप्रमाणे जे स्वतःच अंधश्रद्धेचे भक्त आहे ती विद्यार्थ्यांना काय न्याय देणार? ते विद्यार्थ्यांना काय दिशा देणार? या शिक्षण संस्थेतील तथाकथित संचालकांनी या संस्थेवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी लोकशाहीतील अस्त्रांचा वापर केला असता तर ती निश्चितच अभिमानाची गोष्ट होती. पण अशा अंधश्रद्धेचा अवलंब करून त्यांनी आपले बौद्धिक दिवाळखोरपण घोषित केले आहे असे वाटत नाही का?

# विकासकाले विपरीत बुद्धी

महाराष्ट्र आणि एकंदरीतच देशाला विकासाचे वेड लागले आहे. विकास म्हणजे जास्तीत जास्त इमारती, जास्तीत जास्त रस्ते, जास्तीत जास्त विमानतळ आणि जास्तीत जास्त रेल्वेमार्ग. सध्या सरकारी पातळीवर तर विकासाचा धूमधडाका चालू आहेच; पण देशातील बहुतेक शहरांमध्ये अभूतपूर्व प्रमाणात बांधकामे चालू आहेत. मुंबईत सहा हजार बांधकामांना नियम पाळण्यासाठी तंबी देण्यात आली आहे.राजधानी दिल्ली व परिसरात तर गेल्या वर्षी काही काळ सर्व खासगी बांधकामे बंद ठेवावी लागली होती. तशी वेळ मुंबई, पुणे आणि इतर शहरांमध्ये न येवो. मात्र, त्यासाठी काटेकोर काळजी घ्यावी लागेल. या बांधकामांच्या धुळीमुळे हजारो नागरिक आजारी पडत आहेत. हवेतील प्रदूषणाची पातळी धोक्याची पातळी ओलांडत आहे. कमी; पण वारंवार पडणारा पाऊस पुष्कळदा धूळ खाली बसवतो. तसेही यंदा झाले नाही. उलट, उष्मा प्रचंड वाढला आहे. तो प्रदूषण आणि प्रदूषकांना मदतच करतो. उष्णतेच्या लाटा हवेचे चलनवलन मंदावतात; तसेच स्मॉग म्हणजे धुरके निर्मिती वाढवतात. आता मुंबई महापालिकेने बांधकामाच्या भोवती ३५ फूट उंच पत्र्यांची भिंत बांधणे, बांधकामावर कापडी आवरण घालणे.. वगैरे नियम केले आहेत. नाहीतर, बांधकामे रोखण्याचा इशारा दिला आहे. आता मुंबईचे वॉर्ड ऑफिसर सांगतात, की महापालिकेने केलेली नियमावली अमलात आणण्यासाठी निदान दोन आठवड्यांचा तरी कालावधी लागेल. थोडक्यात, प्रत्यक्ष कारवाईचा विचार दोन आठवड्यांनी होऊ शकेल.केवळ मुंबईतच नव्हे, तर सगळ्या देशभरात राजकीय नेते आणि कार्यकर्ते हेच बहुतेक बिल्डरांचे जुळे भाऊ असतात. नेते तर २४ तास लोकसेवेत बुडालेले असतात. मग त्यांना आपले हे बिल्डर भाऊ सगळे नियम तोडून २४ तास वाट्टेल



तसे बांधकाम उरकत असतात, हे दिसत नसेल का? आता नवीन नियमावलीचाही वापर बिल्डरांकडून अधिक पैसे काढण्यासाठी होऊ नये, म्हणजे मिळवली. जगातील दहापैकी नऊ नागरिक म्हणजे ९० टक्के लोकसंख्या कमी-अधिक प्रमाणात दूषित हवा श्वसनातून शोषत असते. हे प्रमाण धडकी भरविणारे आहे. प्रदूषित हवेने दमा किंवा इतर श्वसनरोग होतात, हे तर माहीत होतेच; पण आता प्रदूषित हवेने स्तनांच्या कर्करोगाचीही शक्यता वाढते, असे वैज्ञानिक म्हणत आहेत. अतिप्रदूषित म्हणजे आज मुंबई-पुण्यात जी हवा आहे; तिच्यामुळे पक्षाघाताचा झटका, फुफ्फुसविकार आणि हृदयातील रक्तवाहिन्या कमकुवत होण्याचाही धोका वाढतो. हा विषय केवळ महापालिका किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपवून चालणार नाही. मुंबई महापालिकेने यंदा एप्रिलमध्ये हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रसामग्रीची मदत घ्यायचे ठरविले होते. त्यासाठी ६५० कोटींचा खर्च करण्याचे ठरविले. मग गेल्या सहा महिन्यांत महापालिकेने काय केले? आज इतकी भयप्रद स्थिती का निर्माण झाली आहे? यात खरेतर राज्य सरकारने लक्ष घालणे आवश्यक आहे; पण या सरकारला कोणत्याच प्रदूषणाची फारशी फिकीर आहे, हे दिसत नाही. ते गणेशोत्सवात दिसलेच. आता गरब्याची वेळ वाढवून देणे, याचा अर्थ सर्वच प्रकारचे प्रदूषण वाढविण्यास प्रोत्साहन देण्यासारखेच आहे. लोकांच्याच हितासाठी लोकानुनय करणार नाही, एवढीही दृष्टी ज्यांच्यात उरलेली नाही, ते मुंबईतल्या वाढत्या प्रदूषणाची चिंता कशाला करतील?या साऱ्या प्रश्नाचा व्यापक पातळीवरचा विचार केंद्र सरकारनेही करायला हवा. आपल्याला वेगाने विकास करावयाचा असेल तर प्रदूषण, निसर्गरक्षण, वृक्षसंरक्षण आदी तत्सम बाबींकडे थोडा काणाडोळा केला तरी चालेल, असा एकंदरीत दृष्टिकोन गेल्या दहा वर्षांत बळावला आहे. सगळ्याच विकास कामांमुळे आणि विशेषत: बांधकाम उद्योगांमुळे विविध स्तरांवर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते, हे खरे आहे. मात्र, पुरेशी काळजी घेऊन, आवश्यक ते प्रतिबंधक उपाय योजून सार्वजनिक किंवा खासगी बांधकामे करण्याची संस्कृती आपण रुजवू शकलेलोच नाही. मुंबईतील हवेच्या प्रदूषणाचा विचार कारखाने किंवा रिफायनरीज, बांधकामे; तसेच रस्ते व इतर विकासकामे आणि धूर ओकणारी वाहने अशा तिन्ही पातळीवर व्हायला हवा. तेलशुद्धीकरण प्रकल्प हवेत सोडल्या जाणाऱ्या गंधक म्हणजे सल्फरचे प्रमाण ठरल्यानुसार कमी करीत आहेत का, खासगी छोटे उद्योग नियम पाळतात का आणि मुंबईतील खासगी वाहनांचे रस्त्यावरील प्रमाण कमी करता येईल का, या व अशा प्रश्नांना राज्य सरकारने मनापासून भिडायला हवे. अर्थातच, यात नागरिकांची भूमिकाही महत्त्वाची आहे; पण मुंबईसारखे सुशिक्षित शहर संघटितपणे आधुनिक प्रश्नांना न भिडता मध्ययुगीन मानसिकतेत जगून निव्वळ दिवस ढकलते आहे. आमची सारी आधुनिकता कचकड्याची आणि दिखाऊ बनली आहे. आदिवासी विस्थापित होतात तेव्हा 'त्यांना मारून विकास करायचा आहे का' असा प्रश्न विचारला जातो. मुंबई आणि सगळ्याच महानगरांमध्ये 'जीवघेण्या प्रदूषणाने माणसे ठार मारून विकासाची वाट चालायची आहे का,' असा प्रश्न विचारावा लागेल. अर्थात, सगळ्यांनी तोच निर्धार केला असेल तर प्रश्नच मिटला!

# काँग्रेसला येतील का 'अच्छे दिन'?

काँग्रेसवर केवळ गांधी कुटुंबियांचीच मक्तेदारी असल्याने अन्य कोणी या पक्षाचा अध्यक्ष झाला तरी तो केवळ नामधारी असेल, हे भाकीत खोटे ठरवत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी स्वत:ची छाप उमटवली आहे. येत्या २६ ऑक्टोबर रोजी त्यांच्या अध्यक्षपदाची वर्षपूर्ती होत आहे.या काळात त्यांनी भाजपची सत्ता असलेल्या हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकवर काँग्रेसचा झेंडा फडकावला. या त्यांच्या जमेच्या बाजू आहेत. असे असले तरी आता होऊ घातलेल्या पाच राज्यांत त्यांची खरी परीक्षा असेल. विरोधकांच्या 'इंडिया' आघाडीच्या निर्मितीत त्यांची महत्त्वाची भूमिका होती. परंतु मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराम या राज्यातील निवडणुकांमध्ये 'इंडिया'तील मित्रपक्षच आमने-सामने आहेत.आपणच सगळी राज्ये जिंकणार आहोत, असे काँग्रेसचे स्वप्नरंजन असेल तर हा भ्रमाचा भोपळा निकालानंतर फुटू शकतो. तसे झाले तर त्याचे खापर नक्कीच खरगे यांच्यावर फोडले जाईल. पाचही राज्यांतील विधानसभा निवडणुका काँग्रेस आणि भाजपसाठी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीची रंगीत तालीम ठरली आहे.जो पक्ष अधिक राज्यात सत्ता काबीज करेल, त्या पक्षाचे केंद्रात सरकार बसेल असे चित्र रंगविले जात आहे. दोन्ही पक्ष वेगाने प्रचाराला लागले आहेत. भाजपने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा चेहरा पुढे करीत जागतिक कीर्तीचा एकमेव नेता म्हणून प्रचाराचे टोक गाठले आहे. दुसरीकडे काँग्रेसने शेतकरी, कष्टकरी, गरीब आणि मध्यमवर्गीयांना साद घालत मतदारांना आकृष्ट करण्याचा चालवला आहे.आणि प्रियांका गांधी दररोजच्या सभा गाजवत आहेत. एक काळ असा होता की, काँग्रेसमध्ये एकाधिकारी नेता म्हणून गांधी कुटुंबातील त्या-त्या वेळी नेतृत्व करणाऱ्या व्यक्ती असायच्या. देशभरातील काँग्रेसच्या नेत्यांसाठी तीन दशकांपासून तीर्थक्षेत्र असलेल्या '१०, जनपथ'मधील चित्र वर्षभरात बदलले आहे.इथे येणाऱ्या कार्यकर्त्यांचे, नेत्यांचे लोंढे '१० राजाजी मार्ग' या खरगे यांच्या निवासस्थानाकडे वळले आहेत. राहुल गांधी यांनीही आपली वेगळी फळी निर्माण करीत खरगेंना स्वतंत्रपणे काम करू दिले. त्यामुळे राहुलचा द्वेष करणारे नेतेही गप्प झाले आहेत. खरगे यांच्याकडे जातीच्याही राजकारणात फिट्ट बसणारा परिपक्व नेता म्हणून पाहिले जाते.हिमाचल प्रदेशात आणि गुजरातेत विधानसभेच्या निवडणुका असताना राहुल गांधी यांची 'भारत जोडो यात्रा' सुरू होती. राहुल गांधी हिमाचलमध्ये फिरकलेही नव्हते. खरगे यांच्या नेतृत्वात किल्ला लढविण्यात आला.भाजपचे अध्यक्ष जे.पी.नड्डा यांचे गृहराज्य असलेल्या हिमाचल प्रदेशात पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि नभोवाणी मंत्री अनुराग ठाकूर यांनी जोरात प्रचार केला होता. परंतु हे राज्य भाजपला गमवावे लागले. हिमाचल जिंकण्याचे श्रेय खरगेंना मिळाले. त्यानंतर कर्नाटकच्या निवडणुकात राहुल, प्रियांका आणि खरगे यांची रणनीती जादू करून गेली.खरगेंचे हे गृहराज्य असल्याचा काँग्रेसला फायदा झाला. भाजपच्या तुलनेत अत्यंत रसातळाला पोहोचलेल्या काँग्रेसने राहुल गांधींच्या नेतृत्वात २०१९ मध्ये लोकसभेची निवडणूक लढवली होती. राहुल, प्रियांका यांच्यासह सोनिया गांधी यांनीही संपूर्ण देश पिंजून काढला. त्यावेळी काँग्रेसच्या अन्य नेत्यांकडे मतदारांनीच पाठ फिरवली होती.काँग्रेस आता संपली, अशी भाकीतं होत गेली. परंतु या निवडणुकीत काँग्रेसने तब्बल



११ कोटी ९५ लाखांच्या जवळपास मते घेतली. ३०३ जागा जिंकलेल्या भाजपने दुप्पट मते घेतली. राहुल गांधीमुळेच पक्षाची दुरवस्था झाल्याचा ठपका काँग्रेसच्या नेत्यांकडून ठेवण्यात आला. पराभवाची जबाबदारी स्वीकारत राहुल गांधी यांनी अध्यक्षपद सोडले. १९९६ ते १९९८ या काळात सीताराम केसरी हे अध्यक्ष होते.चोवीस वर्षांनंतर खरगेंच्या निमित्ताने गांधी परिवाराबाहेरचा अध्यक्ष काँग्रेसला मिळाला. १३८ वर्षांचा इतिहास असलेल्या काँग्रेसने आता अतंर्बाह्य बदलण्याचा केलेला संकल्प पक्षासाठी एक आशेचा किरण ठरू पाहतो आहे. त्यात खरगेंचा ६० वर्षांचा राजकीय अनुभव ही जमेची बाजू आहे. पक्षाचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी सरकारला नेहमीच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. राजस्थानमध्ये मुख्यमंत्री अशोक गहलोत आणि सचिन पायलट यांच्यातील वाद विकोपाला गेला असतांना दोघांनाही पक्षातच ठेवण्याची त्यांनी किमया साधली. कर्नाटकात काँग्रेसचे सरकार आले, तेव्हा सिद्धरामय्या आणि डीके शिवकुमार यांच्यातील वाद शमवून चांगले सरकार देण्याचे श्रेयही खरगे यांनाच जाते.त्यांना छत्तीसगढमध्ये भूपेश बघेल आणि टीएस सिंहदेव यांच्यातही मनोमीलन साधता आले. नाराजांच्या 'जी-२३' मधील नेत्यांशी सुसंवाद होऊ शकला तो खरगेंमुळेच. पक्षाची रणनीती आखताना याही वयात दररोज १५-१६ तास ते काम करतात. त्यांची बोलण्याची शैली, कार्यकर्त्यांशी संवाद यामुळे त्यांची पकड वाढत आहे.खरगे यांची जमेची बाजू म्हणजे ते कार्यकर्त्यांना सहजपणे उपलब्ध आहेत. सुरक्षा वा इतर कारणांमुळे गांधी कुटुंबातील सदस्यांबाबत ते शक्य नव्हते व नाही. खरगेंनी बेरजेच्या राजकारणावर वर्षभरात भर दिला. त्यांच्या विरोधात निवडणूक लढविणाऱ्या शशी थरुर यांना त्यांनी काँग्रेस कार्यकारिणीत घेऊन पक्षांतर्गत विरोधकांना सन्मानाने वागविण्याचा आदर्श घालून दिला. ही कृती सध्याच्या पराकोटीच्या विद्वेषाच्या राजकारणात खरगेंची राजकीय उंची व आदर वाढविणारी आहे.एकीकडे भाजप विधानसभेच्या निवडणुका मोदींच्या प्रतिमेवर लढवत आहेत. स्वत: मोदींनी 'एमपी के मन में मोदी' असे म्हणत एका पत्राद्वारे मध्यप्रदेशातील मतदारांना भाजपला विजयी करण्याचे आवाहन केले आहे.पाच राज्यांपैकी भाजपकडे मध्यप्रदेश एकमेव राज्य आहे. ते हातचे जाऊ नये आणि अन्य राज्येही आपल्याकडे यावीत म्हणून भाजप मेहनत घेताना दिसत आहे. दुसरीकडे बहुतांश राज्यात काँग्रेससाठी अनुकूल वातावरण असल्याचे सर्व्हे येत असल्याने त्यांच्या डोक्यात विजयाची हवा आतापासून गेल्याचेही दिसून येते.मोदींचा विजयरथ थोपविण्यासाठी विरोधी पक्षांनी 'इंडिया'ची स्थापना केली. सगळ्यांनी एकत्र लढण्याच्या आणाभाका घेतल्या. त्यानुसार राज्यनिहाय आकडेमोड व्हायला लागली. 'इंडिया'चेच सरकार येणार असल्याची भविष्यवाणी नेते करायला लागले. परंतु जसजशी निवडणूक प्रक्रिया पुढे जात आहे, तसतसे त्यांच्यातील मतभेद चव्हाट्यावर येत आहेत.आम आदमी पार्टीने छत्तीसगडमध्ये काँग्रेसच्या विरोधात संपूर्ण ९० जागा लढण्याची तयारी केली आहे. इथे काँग्रेसच्या भ्रष्टाचाराविरोधात 'आप'ला प्रचार करावा लागणार आहे. मध्यप्रदेशातही 'आप'चे उमेदवार काँग्रेसच्या उमेदवारांविरोधात दंड थोपटताना दिसतील. समाजवादी पार्टीला मध्यप्रदेशात एकही जागा न दिल्याने अखिलेश यादव काँग्रेसवर नाराज आहेत.'सपा'चे नेते राहुल गांधींसह काँग्रेसच्या नेत्यांवर खालच्या स्तरावर आरोप करीत आहेत, तसेच उमेदवारही उभे करीत आहेत. मग ही कसली 'मजबूत जोड'? काँग्रेस 'इंडिया'तील मित्रपक्षासाठी दोन-चार जागा सोडायला तयार नसेल तर लोकसभा निवडणुकीपर्यंत ही आघाडी टिकेल का, असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.भाजपमधून काँग्रेसमध्ये आलेल्या नेत्यांना उमेदवारी दिल्याने काँग्रेसचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहेत. तिकडे राजस्थानमध्ये अशोक गहलोत यांना खुर्चीचा मोह सोडवत नाही. ते काँग्रेसच्या मुख्यालयात पत्रकार परिषद घेऊन राजस्थानात 'मैं ही मैं हुँ, दुसरा कोई नही' असे पक्षश्रेष्ठींच्या नाकावर टिच्चून सांगतात.या सगळ्याच गोष्टी काँग्रेसच्या 'अच्छे दिन'साठी अडसर ठरणाऱ्या दिसतात. आता खरी परीक्षा मल्लिकार्जुन खरगेंची आहे. ती म्हणजे पक्षांतर्गत विद्रोहाला शांत करणे आणि मोठ्या प्रयत्नांनी उभारलेल्या 'इंडिया'च्या महायज्ञात काँग्रेसचीच आहुती दिली जाणार नाही, याची काळजी घेणे. घोडामैदान जवळ आहे. दररोज नवनवे राजकीय धक्के बसणार आहेत. 'इंडिया'ला आणि 'एनडीए'लाही.

## चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यात किमान आधारभूत किमतीवर सोयाबीन खरेदी सुरू करा

# पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांनी लिहिले मुख्यमंत्र्यांना पत्र

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सोयाबीनच्या उत्पन्नात झालेली घट, सध्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी असलेले सोयाबीनचे बाजारभाव आणि शेतकऱ्यांची मागणी विचारात घेता, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यात किमान आधारभूत किमतीवर सोयाबीनची खरेदी सुरू करण्याबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच आवश्यकता असल्यास याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठवून तात्काळ मान्यता देण्याची शिफारस केंद्र शासनास करावी, असेही पालकमंत्र्यांनी पत्रात नमुद केले आहे.

चंद्रपूर आणि वर्धा या दोन्ही जिल्ह्यांमध्ये सोयाबीन हे एक महत्त्वाचे नगदी पीक आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील ६७ हजार ७६६ हेक्टरवर सोयाबीनची लागवड होते. वरोरा, भद्रावती, चिमुर, राजुरा, कोरपना, गोंडपिपरी, पोंभुर्णा या तालुक्यांमध्ये हे पीक घेतले जाते. या पिकावर ऑगस्टच्या सुमारास पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव झाला. कृषी विभागाने प्रयत्न करून या रोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी मोहिमही हाती घेतली. परंतु १५ ते १८ सप्टेंबरच्या आसपास अचानक सोयाबीनचे पीक काळवंडले. याबाबत कृषी विभाग आणि कृषी विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी क्षेत्रीय भेट देऊन पाहणी केली होती.

पाहणीअंती सोयाबीन पीक पिवळे पडण्यामागचे मुख्य कारण म्हणजे, पावसाचा खंड पडणे आणि जमिनीचे तापमान ३१ ते ३२ अंशापर्यंत पोहोचणे व त्याचा परिणाम म्हणून विविध सोयाबीनवर रोगांचा प्रादुर्भाव होणे असे असल्याचे निदर्शनास आले होते. या दरम्यानच सोयाबीन पिकावर मुळकुज, खोडकूज व रायझोक्टोनिया एरियल ब्लाइट या रोगांचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले. यामुळे दोनच दिवसात सोयाबीनचे पीक पिवळे पडले होते. अशा विविध रोगामुळे या दोन्ही जिल्ह्यातील सोयाबीनच्या उत्पादकतेवर अत्यंत विपरीत परिणाम झाला असून सोयाबीनचे हेक्टरी उत्पन्न घटले आहे.सोयाबीनसाठी ४६०० रुपये इतके किमान आधारभूत मूल्य निश्चित केले आहे. मात्र, सद्यस्थितीमध्ये बाजारात किमान आधारभूत किमतींपेक्षा कमी दराने सोयाबीनची खरेदी होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त होत आहेत. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकरी, कमी उत्पन्न आणि कमी बाजारभाव अशा दुहेरी संकटात सापडला आहे. या दोन जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किमतीवर सोयाबीन खरेदी योजना सुरू करण्याबाबत शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर मागणी होत आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दोन्ही जिल्ह्यात किमान आधारभूत किमतीवर सोयाबीन खरेदी सुरू करण्याची मागणी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे केली आहे.

पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सप्टेंबर महिन्यात राजुरा तालुक्यातील खामोना, पांढरपौनी, हरदोणा ( खु.) येथील शेतशिवरात सोयाबीन पिकावरील रोगामुळे नुकसानग्रस्त भागांचा प्रत्यक्ष पाहणी दौरा केला होता. त्यावेळी त्यांनाही पिकांवर मळकुज, खोडकुज व रायझोक्टोनिया एरीयल ब्लॉईट या रोगांचाही प्रादुर्भाव आढळला. या रोगामुळे दोनच दिवसात सोयाबीनचे पीक पिवळे पडले होते. सोयाबीनवर तीन प्रकारचे रोग दिसल्याने क्षणाचाही विलंब न करता ना .मुनगंटीवार यांनी यासंदर्भात कृषी विद्यापीठाच्या वरिष्ठांशी चर्चा केली होती.

## फडणवीसांच्या मध्यस्थीनंतर नीलेश राणेंचा संन्यास घेण्याचा निर्णय माग

**मुंबई–**केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे पुत्र आणि रत्नागिरी–सिंधुदुर्गचे माजी खासदार नीलेश राणे यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्त होण्याची घोषणा केली होती. त्या नंतर आज त्यांची रवींद्र चव्हाण यांनी भेट घेतली. त्यांच्या भेटीनंतर हे दोन्ही नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी फडणवीस यांच्या निवासस्थानी दाखल झाले होते. अखेर फडणवीस यांच्या मध्यस्थीनंतर नीलेश राणे यांनी निवृत्तीचा निर्णय रद्द केला असल्याची माहिती रवींद्र चव्हाण यांनी माध्यमांना दिली. कार्यकर्त्यांची कामे होत नसल्यामुळे नीलेश राणे नाराज होते मात्र, आता त्यांची नाराजी दूर करणार असल्याचे रवींद्र चव्हाण यांनी सांगितले आहे.नीलेश राणे यांनी दसऱ्याच्या दिवशी आपल्या निवृत्तीच्या निर्णयाची घोषणा केली होती. या निर्णयाचे सिंधुदुर्ग जिल्ह्यात पडसाद उमटले होते. नीलेश राणे यांना भेटण्यासाठी कार्यकर्त्यांनी कणकवली येथे मोठी गर्दी केली होती. मुंबईवरूनही अनेक



कार्यकर्ते कणकवलीच्या दिशेने निघाले होते. कुडाळ नगरपंचायतीमधील अभिषेक गावडे व प्राजक्ता शिवलकर या दोन नगरसेवकांनी देखील आपल्या पदाचे राजीनामे दिले होते.

# ललित पाटील ड्रग्ज प्रकरणी शिवसेनेच्या नेत्याचे नाव समोर

## कार चालकाची चौकशी, धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता

**नाशिक–**ड्रग्ज माफिया ललित पाटील याच्याशी संबंधीत अनेक प्रकरणाचा आता खुलासा होत आहे. या प्रकरणात नाशिक पोलिसांना मोठे धागेदोरे हाती लागले आहेत. या प्रकरणात शिवसेनेच्या एका मोठ्या नेत्याचे नाव समोर आले आहे. या नेत्याच्या कारचालकाची या प्रकरणात चौकशी करण्यात आली आहे. तपास यंत्रणा या संदर्भातील धागेदोरे जोडत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ललित पाटील याच्या अपघातग्रस्त कारची दुरुस्ती करण्यासाठी या कार चालकाने मध्यस्थी केल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे या कार चालकाचीही चौकशी करण्यात आली आहे. मात्र, हा कार चालक सध्या एका मोठ्या नेत्याकडे कामाला आहे. त्यामुळे या प्रकरणात नेत्याची भूमिका देखील संशयात येण्याची शक्यता आहे.ललित पाटील हा तस्करीच्या धंद्यात उतरण्यापूर्वीपासूनच राजकारणात सक्रिय होता. शिवसेनेचे प्रमुख पद त्याच्याकडे होते. त्यामुळे अनेक मोठ्या नेत्यांशी त्याचे चांगले संबंध होते. त्याच्या अटकेनंतर नाशिक शहरातील राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. यात उद्धव ठाकरे गट आधि एकनाथ शिंदे गट एकमेकांच्या नेत्यांवर आरोप–प्रत्यारोप करत आहेत. यातच आता शिवसेनेच्या मोठ्या नेत्याच्या कार चालकाची चौकशी करण्यात आल्याने या प्रकरणाकडे आता सर्वांचेच लक्ष वळले आहे.वास्तविक ललित पाटील वापरत असलेल्या कारला २०१५ मध्ये अपघात झाला होता. तेव्हा शिवसेनेच्या नेत्याच्या खासगी चालकाच्या मदतीने ही कार गॅरेजमध्ये दाखवण्यात आली होती. तेव्हापासून ही कार त्याच गॅरेजमध्ये पडून आहे. ती कार घेण्यासाठी ललित पाटील पुन्हा आलाच नाही. या प्रकरणी गॅरेजचालकाकडे चौकशी केली असता, सदरील माहिती समोर आली होती. त्या नंतर तपास अधिकाऱ्यांनी संबंधीत नेत्याच्या वाहन चालकाची देखील या प्रकरणात चौकशी केली आहे.शिवसेना पदाधिकारी असताना ललित पाटील अनेकदा पक्षाच्या नेत्याच्या भेटीसाठी येत होता. त्यामुळे त्यांच्याशी चांगली ओळख झाल्याने सदरील कार चालकाने तपास अधिकाऱ्यांना सांगितले आहे. त्याच वेळी ललित पाटील याने कार दुरुस्तीविषी विचारले असता या गॅरेजची ओळख सांगीतली असल्याचे कार चालकाचे म्हणणे आहे. मात्र, कार परत घेण्यासाठी ललित पाटील परत आला नसल्याने कार चालक आणि गॅरेज चालकांनी त्याच्याशी वांरवार संपर्क करण्याचा प्रयत्न केल्याचेही चालकाने सांगितले आहे. या प्रकरणात आणखी काही धागेदोरे मिळतात का? याचा अधिकारी तपास करत आहेत.

## कोणी मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा प्रयत्न करत असेल तर त्याचे तुकडे होतील–उद्धव ठाकरे





**मुंबई–**कोरोना काळातील घोटाळ्यांची चौकश करत आहात, तर मग ठाणे, पुणे, नागपूर महापालिकेची पण करा, हिंमत असल्यास पीएम केअर आणि जम्मूपर्यंत चौकशी करा, आम्ही मुंबई, महाराष्ट्र वाचवले त्याचे कौतुक नाही. आमच्या अंगावर येतायत पण शेण हे खातायत, पीएम केअर फंड घोटाळ्याचं काय? अशी थेट प्रश्न शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला.

जो कोणी मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा प्रयत्न करेल त्याचे तुकडे होतील, असा इशाराच त्यांनी यावेळी दिला. ते म्हणाले की, किती जणांना बुलेट ट्रेनचा उपयोग होणार? इथल्या गद्दारांना पटकन गुजरातला पळता यावे म्हणून ही बुलेट ट्रेन आहे. जो कोणी मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा प्रयत्न करेल त्याचे तुकडे होतील. मुंबई आर्थिक राजधानी आहे का? कारण सगळे गुजरातला चालले आहे, फिल्मसिटी उत्तर प्रदेशाला नेत आहेत, असेही ठाकरे म्हणाले.धारावी पुनर्विकास मुद्यावरून उद्धव ठाकरे यांनी हल्लाबोल केला. ते म्हणाले की, धारावीचा विषय मी बघणार आहे, कोण तो तुमचा मित्र? माझे डोळे पांढरे झाले, दीडशे कोटींचा एफएसआय हा विकास मित्राचा विकास करायला. ते पुढे म्हणाले की, गिरणी कामगाराच्या मुलाला पण घरे द्या. धारावीचा विकास तुमच्या मित्राच्या खिशात जाणार असेन तर आम्ही ते होऊ देणार नाही, रस्त्यावर उतरू. जो कोणी मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा प्रयत्न करेल त्याचे तुकडे होतील. संजय राऊत भ्रष्टाचारावर बोलले, पण उद्या सरकार आपले येणारच. आम्हाला आज त्रास देतायत पण तुम्हाला उलटे टांगू.दरम्यान, उद्धव ठाकरे मराठा आरक्षणासाठी आंदोलन करत असलेल्या मनोज जरांगे पाटील यांनाही धन्यवाद दिले. ते म्हणाले की, जरांगे पाटलांना धन्यवाद देतो, धनगरांना त्यांनी साथ दिली. मी मुख्यमंत्री होतो तेव्हाही मराठा आरक्षण प्रश्न होताच पण तेव्हा मी मारहाणीचा आदेश दिला नव्हता. गद्दारांमध्ये हिम्मत असेन तर हा आरक्षणाचा प्रश्न सोडवा. हा विषय लोकसभेत सोडवा, पोट कोणत्याही जातीचे असो ते भरायलाचा पाहीजे हे राज्यकर्त्यांचे काम असते. मनोज जरांगे पाटलांना धन्यवाद देतो, अत्यंत समजदारपणाने आंदोलन करत आहेत, अशा शब्दात शिवसेना दसरा मेळाव्यातून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली.

### शिक्षकांच्या काही मान्यता संशयाच्या भोवऱ्यात!

# 'प्राथमिक' कार्यालयातून आवक-जावक नोंदवह्या गहाळ

**सोलापूर :** जिल्ह्यातील २० टक्के टप्पा अनुदानाच्या १० शाळा आणि २५ तुकड्यांवरील १५३ पैकी केवळ १२ शिक्षकांचेच रेकॉर्ड क्लेअर असल्याने त्यांना शालार्थ आयडी मिळाला. पण, १४१ शिक्षकांना अजून तो मिळालेला नाही. त्यातील ७० शिक्षकांचे प्रस्ताव प्राथमिक शिक्षण कार्यालयाकडे प्राप्त झाले, पण अनेकांच्या मान्यतेचे रेकॉर्डच सापडत नाही. त्यामुळे पैसे घेऊन अर्धवट कागदपत्रांवर मान्यता दिल्याचा संशय निर्माण झाला असून आता पोलिसांत तपासांत या बाबी समोर येतील, असा विश्वास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.खासगी विनाअनुदानित प्राथमिक शाळांना २० टक्के वाढीव टप्पा अनुदान देण्याचा निर्णय शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी घेतला. त्यासाठी जवळपास सोळाशे कोटींचा निधीही दिला. परंतु, अजूनपर्यंत अनेक शाळांमधील शिक्षकांना शालार्थ आयडी मिळालेला नाही.सोलापूरच्या माध्यमिक शिक्षण विभागातील २९८ शिक्षकासह प्राथमिक विभागातील १४१ शिक्षकांचा विषय अजूनही प्रलंबितच आहे. आता माध्यमिक शिक्षण विभागातील सात आवक– जावक नोंदवह्या गहाळ झाल्याप्रकरणी सदर बझार पोलिसांत एफआयआर दाखल झाल्यानंतर शिक्षण उपसंचालक स्तरावरून २९८




शिक्षकांच्या शालार्थ आयडीसंदर्भातील कार्यवाही सुरु झाली आहे. त्यावेळी अन्य कागदपत्रांचा आधार घेतला जात आहे. काही दिवसांत ज्यांच्याकडे अन्य २२ पुरावे आहेत, त्यांना शालार्थ आयडी मिळेल, असे उपसंचालक कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.आता प्राथमिक शिक्षण विभागाकडेही २००९ पासूनचे तीन ते चार नोंदवह्या गहाळ झाल्याची बाब समोर आल्याने तत्कालीन अधिकारी संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. कार्यालयातील सर्व नोंदवह्या आहेत, पण शिक्षक मान्यतेची माहिती असलेल्याच नोंदवह्या गहाळ कशा होतात, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. आता या प्रकरणी देखील पोलिसांत फिर्याद दाखल होणार आहे. त्यामध्ये कोणत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नावे असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.प्राथमिक शिक्षण विभागातील काही आवक– जावक नोंदवह्या सापडत नाहीत. दुसरीकडे काही शिक्षकांच्या मान्यतेचे रेकॉर्ड आहे, पण आवक– जावक नोंदवह्यातील नोंदी व मान्यतेवरील नोंदी जुळत नाहीत. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करून पोलिसांत फिर्याद देण्याची कारवाई होईल.

# विमा कंपनीने शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी

## विभागीय आयुक्तांनी केले विमा कंपनीचे अपील खारीज;पिकाच्या खरीप हंगामातील प्रतिकूल परिस्थितीबाबत अधिसुचना सुनावणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पिकाच्या हंगामातील प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे होणारे नुकसान या जोखमेच्या बाबीअंतर्गत झालेल्या नुकसानीबाबत विमा कंपनीने विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे दाखल केलेले अपिल खारीज करण्यात आले आहे. तसेच विमा कंपनीने शेतक–यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी, असे आदेश विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी दिले आहे.

जिल्ह्यात सोयाबीन पिकाकरीता १२ तालुक्यातील ३५ महसूल मंडळासाठी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी २० सप्टेंबर २०२३ रोजी अधिसूचना निर्गमित केली होती. याबाबत दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीने ३ ऑक्टोबर रोजी विभागस्तरीय समितीकडे अपील केले होते. विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी सर्व वस्तुस्थितीचा विचार करता दि. २३ ऑक्टोबर २०२३ रोजी सुनावणी घेऊन बैठकीत उपस्थित शेतकरी प्रतिनिधी, के.व्ही.के. तज्ञ, कंपनी प्रतिनिधी यांचे म्हणणे व कृषी विभागाचे मत विचारात घेतले. विषयाशी संबंधित सर्व कागदपत्रांच्या पडताळणीअंती प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये समावेश असलेल्या हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या जोखीमेच्या बाबीअंतर्गत नुकसानीसाठी चंद्रपूर जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दि. २० सप्टेंबर २०२३ रोजी निर्गमित केलेली अधिसूचना ही योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार योग्य आहे. त्यामुळे विमा कंपनीने दाखल केलेले अपील खारीज करण्यात येत आहे. यावेळी नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्यासह, व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जिल्हाधिकारी विनय गौडा, तर नागपूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक राजेंद्र साबळे, विमा कंपनीचे क्षेत्रीय प्रबंधक विनोद इंगळे, विभागीय व्यवस्थापक अभिषेक अत्रे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, सिंदेवाही कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.विनोद नागदेवते, शेतकरी प्रतिनिधी राजू बुद्धलवार, आदी विभागस्तरीय समिती सदस्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. सदर सुनावणीच्या वेळी दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे प्रतिनिधी विनोद इंगळे यांनी चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी काढलेली अधिसूचना योजनेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे नाही, तसेच संयुक्त सर्वेक्षणाची माहिती विमा कंपनीला देण्यात आली नसल्याचे सांगितले. विमा कंपनीचे विभागीय व्यवस्थापक अभिषेक अत्रे यांनी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये तालुकास्तरावर पीक नुकसानीचे सर्वेक्षण करतांना सर्वेक्षणाचे वेळापत्रक संयुक्त सर्वेक्षणाकरीता विमा कंपनीला कळविण्यात न आल्याचे सुनावणीदरम्यान सांगितले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी तालुकास्तरावर सर्वेक्षण करण्याबाबत विमा कंपनीला व तालुका कृषी अधिकारी (सर्व) यांना पत्राद्वारे कळविण्यात आले होते. त्याबाबतच्या सर्व कागदपत्रांची पडताळणी केली असता जिल्हास्तरावरून वेळेत सूचना दिल्याचे निदर्शनास आले. सर्व तालुक्याचे सर्वेक्षण पूर्ण करून दि. १८ सप्टेंबर २०२३ अखेर जिल्हास्तरावर सर्वेक्षण अहवाल प्राप्त झाले. जिल्हास्तरावरून जिल्हास्तरीय संयुक्त समितीने सोयाबीन पिकाच्या सर्वेक्षणाअंती झालेल्या नुकसानीबाबतची वस्तुस्थिती जिल्हाधिकारी विनय गौडा यांना निदर्शनास आणून दिली. चंद्रपूर जिल्ह्यातील सोयाबीन पिकाचे कीड व रोगामुळे तालुकास्तरीय समितीचा व जिल्हास्तरीय संयुक्त समितीचा सर्वेक्षण अहवाल बैठकीत समितीसमोर ठेवण्यात आला. या वस्तुस्थितीबाबत सोयाबीन पिकाचे कीड व रोगामुळे ३५ महसूल मंडळामध्ये २५ टक्केपेक्षा जास्त क्षेत्रावर प्रादुर्भाव झाल्याने या महसूल मंडळात ५० टक्केपेक्षा जास्त उत्पादनात घट होणार ही बाब मान्य करण्यात आली. या बैठकीस जिल्हास्तरावरील विमा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच तालुका व जिल्हास्तरावर सर्वेक्षण करताना विमा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांच्या संयुक्त सर्वेक्षण अहवालावर स्वाक्षरी आहे. जिल्हास्तरावरील संयुक्त आढावा समिती सभेमध्ये विमा कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावरील संयुक्त आढावा समिती सभेमध्ये चंद्रपूर जिल्ह्यात सोयाबीन पिकाचे कीड व रोगामुळे झालेल्या नुकसानीबाबत हंगामातील प्रतीकूल परिस्थितीबाबत करण्यात आलेली संपूर्ण कार्यवाही बैठकीत विषद करून कंपनीला काही आक्षेप असल्याबाबत विचारणा केली असता, कंपनीचे कोणतेही आक्षेप नाही असे बैठकीत सांगण्यात आले. याबाबतची नोंद दि. २० सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये घेण्यात आल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. सोयाबीन पिकाच्या प्रतिकूल परिस्थितीबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कार्यवाही करण्यात आली असून आवश्यक त्या ठिकाणी कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित असल्याचे निदर्शनास आले. कंपनीचा कोणता प्रतिनिधी कुठे उपस्थित ठेवावा? ही बाब विमा कंपनीशी संबंधित असून यामुळे झालेली कार्यवाही कंपनीचे जबाबदार प्रतिनिधी उपस्थित नाही, हे कंपनीचे म्हणणे योग्य नसल्याचे विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांनी कंपनीच्या प्रतिनिधीस निदर्शनास आणून दिले. तसेच सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन आदेश पारित करण्यात आला.

# देवरावसारखा धडपडणारा कार्यकर्ताच,नेता म्हणून पुढे येतो-ना.सुधीर मुनगंटीवार

## राजुरा वासीयांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात माँ शक्ती गरबा महोत्सवाची सांगता

**राजुरा । प्रतिनिधी**

येथील मा. ना. सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्राच्या माध्यमातून दि. १४ आक्टोंबरपासून आयोजित करण्यात आलेल्या माँ शक्ती गरबा महोत्सव-२०२३ ची सांगता राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.रविवारी (दि. २२) रोजी अष्टमीच्या दिवशी आयोजित केलेल्या महास्पर्धेला उपस्थित राहून ना. सुधीर मुनगंटीवार यांनी राजुरा वासीय गरबाप्रेमींचा उत्साह वाढवला. याठिकाणी अष्टमीचे औचित्य साधून राजुरा तालुक्यातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी राजुरा ०९ प्रतिभाशाली महीलांचा ना. सुधीर मुनगंटीवार यांचे शुभहस्ते सन्मान करण्यात आला; यामध्ये कृतिका सोनटक्के, चित्रलेखा धंदरे, माधुरी भोंगळे, करूणा जांभुळकर, रोशनी जांभुळे, शालिनी बोंथला, अलका सदावर्ते, वर्षा कोयचाळे आणि शिला जाधव यांचा समावेश आहे.

त्यानंतर पार पडलेल्या महास्पर्धेत विजयी ठरलेल्या प्रथम वैदेही कुलकर्णी, द्वितीय समीर बोरकर तर तृतीय अदिती रामगीरवार यांनाही पारीतोषीकांचे वितरण करण्यात आले; यासोबतच लकी ड्रॉ व लहान मुलांच्या स्पर्धेतील विजेत्यांनाही पारितोषिकांचे वितरण ना. सुधीर मुनगंटीवार यांचे हस्ते पार पडले.याठिकाणी बोलतांना, नवरात्रीचा हा आध्यात्मिक उत्सव म्हणजे माँ शक्तीच्या उपासनेचा, उर्जेचा जागरोत्सव असतो. माँ आदीशक्ती तुम्हा सर्वांना सकारात्मक उर्जा प्रदान करो; आज अष्टमीच्या पावन दिनी तुमच्याशी भेटून मला आनंद होत आहे. याचसोबत समाजामधे सेवाभावी वृत्तीनं उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नवदुर्गांचा सन्मान याठिकाणी करण्यात आला; याहून मोठे दुसरे कार्य नाही. त्यामुळे त्या भगीनींनाही मी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. असे प्रतिपादन ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले.पुढे बोलताना, राजुरा विधानसभा क्षेत्र प्रगतीच्या, विकासाच्या मार्गावर पुढे जावा; यासाठी तुम्ही जे आशिर्वाद देत आहात, ते लाखमोलाचे आहेत. याठिकाणी देवरावजी व त्यांच्या टीमचे कौतुक करावेसे वाटते. मागील दोन महिन्यांपासून ते राजुरा शहरात विविध सेवाभावी कार्यक्रम आयोजित करताहेत, येथील सेवा केंद्रही गोरगरीबांच्या सेवेसाठी निरंतर सुरू आहे. मी मागेही म्हटले होते की जो करता है सेवाभाव, उसका नाम है देवराव तसेच सेवाभावी कार्य ते करतात. ते आधीपासूनच धडपडणाऱ्या वृत्तीचे आहेत, त्यामुळे असा सेवेसाठी धडपडणारा कार्यकर्ता पुढे येऊन नेता बनतो हे आवर्जून नमुद करण्यासारखे आहे. असेही ते म्हणाले.प्रास्ताविकपर भाषणात, कोणतेही चांगले कार्य सिद्धीस नेतांना विघ्न हे येतच असतात त्यामुळे आपल्याही गरबा महोत्सवात विघ्न घालण्याचे काम काही संकुचित विचारांनी करण्याचा असफल प्रयत्न केला, पण आईजगदंबेचा आशिर्वाद आणि आपल्या सारख्या माता-भगगीनींचा पहिल्या दिवसांपासूनचा उत्स्फूर्त प्रतिसाद हा त्या विघ्नसंतोषींवर रामबाण ठरला. आदरणीय सुधीरभाऊंच्या मार्गदर्शनात या भागाचा विकास व जनसेवा करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून यापुढेही आपले सहकार्य असेच राहुद्या. अशी भावना आयोजक देवराव भोंगळे यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाला, आरपीआयचे नेते सिद्धार्थ पथाडे, चंद्रपूर महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, तालुकाध्यक्ष सुनिल उरकुडे, जिल्हा उपाध्यक्ष विनायक देशमुख, संजय उपगण्लावार, अरुण मस्की, सुरेश रागीट, मिलिंद देशकर, विनोद नरेन्दुलवार, सचिन बैस, भाऊराव चंदनखेडे, महेश रेगुंडवार, नितीन वासाडे, सोमेश्वर आईटलावार, प्रशांत गुंडावार, राधेश्याम अडाणीया, सईद कुरेशी, दिलीप गिरसावळे, सुरेश धोटे, वाघू गेडाम, सय्यद अली, सय्यद चांद, प्रज्वलंत कडू, सुरज पेदूलवार, सुनिल डोंगरे, अजय राठोड, मोहन कलेगुरवार, छबिलाल नाईक, रत्नाकर पायपरे, दिपक झाडे, सत्यम गाणार, माजी पं.स. सदस्या सुनंदा डोंगे, माजी नगरसेवक उज्ज्वला जयपुरकर, प्रिती रेकलवार, ममता केशट्टीवार, सिमा देशकर, स्वरूपा झंवर, शुभांगी रागीट, शितल वाटेकर, माणिक उपलेंचवार, प्रियदर्शनी उमरे, राणी नळे, योगीता भोयर, अर्चना भोंगळे, वैशाली ढवस, सचिन भोयर, राजकुमार डाखरे, केतन जुनघरे, मयुर झाडे, आसिफ सय्यद, मिथुन घिवे, स्वप्निल पहानपटे, अंकुश कायरकर, चेतन काटोले, छोटू मसादे, शुभम राखुंडे, लुकेश होकम, वैभव पावडे, अमोल मोरे, वैभव पावडे आदिंसह मोठ्या संख्येने स्थानिकांची उपस्थिती होती.-






# शेतकरी आत्महत्येची २० प्रकरणे मदती करीता निकाली

## अपर जिल्हाधिकारी श्रीकांतदेशपांडे यांनी घेतला आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय शेतकरीआत्महत्या प्रकरणे तपासणी समितीच्या बैठकीमध्ये शेतकरी आत्महत्येच्या एकूण२९प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. अपर जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्याअध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या या बैठकीत२०प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली असून८प्रकरणे समितीने अपात्र ठरविली आहे,तर उर्वरित एक प्रकरण फेरतपासणी साठी प्रलंबितठेवण्यात आले आहे. आढावा बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार,कृषी उपसंचालक चंद्रकात ठाकरे,नायब तहसीलदार(सामान्य) गिता उत्तरवार,महसूलसहाय्यक प्रमोद गेडाम,जिल्हा अग्रणी बँकेचे तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेचेप्रतिनिधी आदी प्रामुख्याने उपस्थित होते.शेतीमध्ये सततची नापिकी,कर्जबाजारीपणा



व कर्जपरतफेडीचा तगादा या तीन प्रमुख कारणांपैकी शेतकरी आत्महत्या झाली असल्यास संबंधितकुटुंबाला आर्थिक मदत देण्यात येते. जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत शेतकरीआत्महत्येच्या२९ प्रकरणांवर चर्चा झाली.यापैकी२०प्रकरणे पात्र करून मदतीकरीता निकाली काढण्यात आली तर८प्रकरणे समितीनेअपात्र ठरविली. तर उर्वरित एक प्रकरण समितीने फेरतपासणी साठी प्रलंबित ठेवले आहे.

# मेरी माटी मेरा देश कलश यात्रा उपक्रमाचे रमेश राजूरकर यांच्याकडून स्वागत

**वरोरा । प्रतिनिधी**

मेरी माटी मेरा देश या राष्ट्रव्यापी उपक्रमांतर्गत आयोजित कलश यात्रा दिल्ली येथील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत ०१ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रम स्थळी नेण्यात येणार आहे.या उपक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात यशस्वी नियोजन करिता वसुंधरा वंदन, शिलापथक, पंचप्राण शपथ, शहीद वीरांच्या कुटुंबांचा सन्मान*असे नानाविध उपक्रम स्वरूपात राबविण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील अमृत कलशाची उत्सव स्वरूपात यात्रा काढून विभागातील घरोघरी जाऊन सर्व विधानसभा निहाय कलशाची विभागणी करण्यात आली असुन सदर मिट्टी कलश नेहरू युवा केंद्र चंद्रपूर माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यात स्वयंसेवकांच्या व युवकांच्या सहभागातून प्रथमतः मुंबई येथे तदनंतर दिल्ली येथे नेण्यात



येणार आहे, त्या कलश यात्रेचे वरोरा शहरांमध्ये रमेश राजुरकर, भाजपा विधानसभा प्रमुख, ७५- वरोरा विधानसभा क्षेत्र, यांनी नेहरू युवा केंद्र चंद्रपूर चे स्वयंसेवकांचे व युवकांचे स्वागत केले व त्यांच्या पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या. या उपक्रमांतर्गत पहिला टप्पा म्हणून २७ ऑक्टोबर २०२३ रोजी क्रांती मैदान, मुंबई येथे सर्व मिट्टी कलश संकलित करण्यात येणार असून त्यानंतर शासनामार्फत ०१ नोव्हेंबर २०२३ रोजी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उपस्थित होणाऱ्या कार्यक्रमास्थळी संकलित करण्यात येणार आहे.

# रोटरीच्या वतीने जागतिक पोलिओ दिन साजरा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरच्या वतीने २४ ऑक्टोंबर हा जागतिक पोलिओ दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महापालिका आयुक्त विपीन पालिवाल यांनी १४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारताने पोलिओ वर मात केल्याचे सांगितले.

चांदा क्लब ग्राऊंड येथे आयोजित जागतिक पोलिओ दिन कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महापालिका आयुक्त विपिन पालिवाल उपस्थित होते. मंचावर रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरचे अध्यक्ष अनुप यादव, रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ.विजय आईंचवार, रोटरी क्लबचे सचिव कुंजबिहारी परमार, अजय पालारपवार, प्रदीप पवार उपस्थित होते. याप्रसंगी आयुक्त विपिन पालिवाल यांच्या हस्ते आकाशात फुगे सोडण्यात




आले. तसेच पोलिओ अभियानाची जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना आयुक्त पालिवाल यांनी जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारताने पोलिओ आजारावर लसीकरणाच्या माध्यमातून मात केल्याचे सांगितले. शहरी तसेच ग्रामीण भागात अतिशय नियोजनबध्द पध्दतीने लसीकरण अभियान राबविण्यात आले. त्यामुळेच आपण या आजारावर मात करू शकलो, करोना संक्रमणाचा देखील आपण अशाच पध्दतीने सामना केल्याचे पालिवाल यांनी सांगितले. रोटरीचे माजी अध्यक्ष डॉ.विजय आईंचवार यांनीही याप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना पोलिओ निर्मुलनाची माहिती दिली. तर रोटरी अध्यक्ष अनुप यादव यांनी प्रास्ताविक भाषणात रोटरीच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक कार्यांची माहिती दिली. यावेळी आयुक्त पालिवाल यांच्या हस्ते रोटरी उत्सव २०२३ च्या बॅनरचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप पवार यांनी केले तर आभार सचिव कुंजबिहारी परमार यांनी मानले. कार्यक्रमाला रवींद्र जैन, राम चांदे, महेश उचके, अशोक हासानी, अरूण तिखे, अजय जयस्वाल, सचिन गांगरेड्डीवार, संजय उपगन्लावार, अनुपमा भामरी, श्रीकांत रेशीमवाले, तेलंग, नविन चोरडीया, अविनाश रघुसे,अनुप बोरडे, उत्तम डाखरे, मिलिंद बोडखे, नरेंद्र बुरांडे, अभय झाडे, अविनाश उत्तरवार, मनिष बोराडे उपस्थित होते.

# भ्रष्टाचार,आतंकवाद व महागाईचा अंत करा - डॉ.आगलावे

**वरोरा । प्रतिनिधी**

समाजातुन भ्रष्टाचार, आतंकवाद व महागाईचा अंत करण्याचे आवाहन डॉ. अंकुश आगलावे यांनी माजरी येथील वेकोलि क्रीडा संकुलातील पुतळा दहनाच्या कार्यक्रमात केले.

डॉ. आगलावे पुढे म्हणाले की, दसरा सण हा विजयाचे प्रतीक आहे, आज सर्वत्र भ्रष्टाचार व अन्यायाचा अंधार पसरलेला असून प्रत्येकानी प्रकाशाची इच्छा मनात ठेवून अंधाराचा नायनाट व वाईट विचाराचा दहन करायला पाहिजे. सदर कार्यक्रमास माजरी परिसरातील गावातील दहा हजार पेक्षा अधिक नागरीक उपस्थित होते. यावेळी भ्रष्टाचार, आतंकवाद व महागाई रूपाचा ५० फुटाचा पुतळा कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. सदर कार्यक्रम शासनाच्या नियमांना अधीन राहून




व परवानगी घेवून करण्यात आला. या कार्यक्रमाला वेकोलि विभागाचे सब एरिया मॅनेजर आर. मुगम, कॉलरी मॅनेजर मढर, सेफ्टी मॅनेजर सिन्हा, रमेश राजुरकर ,नरेंद्र जीवतोडे, एहतेशाम अली, रेड्डी बाबु, तिवारी , राजेंद्र कुमार, पांडे बाबु, राजेश रेवते, सरपंच जंगम या कार्यक्रमाचे नेतृत्व ज्येष्ठ भाजपा नेते एम.पी. राव यांनी केले तर आयोजन हॅन्डसन राव व मित्र परिवार यांनी केले.


# चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यातील कृषिपंपांना दिवसा १२ तास वीज पुरवठ्यासाठी सुधीर मुनगंटीवार सरसावले

## ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सकारात्मक प्रतिसाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्याला कृषी पंपांना दोन महिन्यांसाठी दिवसाचे १२ तास वीज पुरवठा देण्यात यावा, या मागणीसाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर, वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार पुढे सरसावले आहेत. विदर्भातील या तीन जिल्ह्यांना दोन महिन्यांसाठी सलग वीजपुरवठा प्राप्त व्हावा यासाठी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आग्रही मागणी केली. कृषी पंपाना सध्या नियमित विजेची गरज आहे. आता शेतात धान उभा आहे आणि बाकी पिकांना ही पाण्याची गरज आहे. रात्रीच्या वेळी वन्यप्राणी यांचा वावर असल्याने शेतकऱ्यांना शेतात जायला शेतकऱ्यांना अडचण निर्माण होते. याशिवाय उत्सवाचे दिवस आहे.गडचिरोली हा नक्षल प्रभावी जिल्हा असल्याने शेतीसाठी व उत्सवाच्या काळात या जिल्ह्याला सुरळीत वीज पुरवठा होणे गरजेचे आहे ही बाब ना. मुनगंटीवार यांनी ऊर्जा मंत्र्यांच्या लक्षात आणून दिली. चंद्रपूर आणि वर्धा हे दोन्ही जिल्हे विदर्भातील महत्त्वाचे जिल्हे आहेत. या दोन्ही जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना पिकाच्या दृष्टीने व नागरिकांना उत्सवाच्या काळात सुरळीत वीज पुरवठा होणे, गरजेचे असल्याची बाब या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्री म्हणून ना. सुधीर मुनगंटीवार यांनी अधोरेखित केली. दोन महिने या तीनही जिल्ह्यांना दिवसा १२ तास वीज पुरवठा झाला पाहिजे, अशी आग्रही मागणी ना. मुनगंटीवार यांनी ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या या मागणीला ऊर्जामंत्री यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. विदर्भातील या तीन जिल्ह्यांना सुरळीत वीज पुरवठा कसा करता येईल, या संदर्भात लवकरच योग्य तो निर्णय घेण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी ना .देवेंद्र फडणवीस यांनी दिली.





# मेरी माटी मेरा देश या उपक्रमासाठी आनंद निकेतन कॉलेजच्या दोन विद्यार्थ्यांची निवड

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती द्वारा संचालित आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन वरोरा येथील हे दोन्ही विद्यार्थी समाजशास्त्र या विषयात एम.ए. ला शिक्षण घेत आहे.आणि राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे दोन्ही विद्यार्थी स्वयंसेवक आहे.शुभम शिवशंकर आमने हा विद्यार्थी एम.ए.समाजशास्त्र या विषयात शिक्षण घेत असून परसोडा या गावातील रहिवाशी आहे.गावामध्ये विविध नाविन्य उपक्रम आणि विविध कार्यक्रम घेत असतो. सामाजिक क्षेत्रात आवड असल्यामुळे शारदा फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून वरोरा तालुक्यात सामाजिक, शैक्षणिक, व सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत आहे.निकिता गजानन माणूसमारे ही विद्यार्थीनी एम. दृतीय वर्षाला शिक्षण घेत आहे. पाचगाव (ठा) येथील रहिवाशी असून ती देखील विविध सामाजिक उपक्रम




घेत असून कार्यक्रमात सहभागी होत असते. दोन्ही विद्यार्थ्यांची निवड ही नेहरू युवा केंद्र, चंद्रपूर यांच्या माद्यमातून वरोरा तालुक्यातून केली आहे.स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्त 'मेरी माटी मेरा देश' या केंद्र सरकारच्या उपक्रमात प्रत्येक गावात विरांना वंदन करणार स्मारक तयार करून त्या गावाची माती तालुक्याच्या ठिकाणी गोळा करण्यात येत असून वरोरा तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या सर्व ८१ ग्रामपंचायत मधून गोळा करण्यात आलेल्या मातीचा मंगल कलश दिल्ली येथे विरांच्या स्मरणार्थ तयार करण्यात येत असलेल्या वाटीकेसाठी वापरण्यात येणार आहे.कार्यक्रम दि.२६ व २७ ऑक्टोबर रोजी क्रांती मैदान मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थिती होणार असून दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थिती मध्ये दि.३१ ऑक्टोबर ला संपन्न होत आहे.कार्यक्रमात तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शुभम आमने आणि निकिता माणुसमारे यांची निवड करण्यात आली असून त्याचे सर्वत्र कौतुक केल्या जात आहे. पंचायत समिती वरोरा येथून नेहरू युवा केंद्राच्या स्वयंसेवकांना कलश सोपविण्यात आला त्यावेळी गट विकास अधिकारी वरोरा संदीप गोडशेलवार आणि नरेंद्र पेटकर, प्रणव बक्षी व अन्य कर्मचारी उपस्थित होते.शुभम आमने आणि निकिता माणूसमारे यांनी तालुक्यातील पंचायत समिती वरोरा चे गट विकास अधिकारी संदीप गोडशलवार आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन व नेहरू युवा केंद्र चंद्रपूर चे जिल्हा युवा अधिकारी शमशेर सुभेदार आणि जिल्हा प्रशासनाचे व अन्य मार्गदर्शकांचे या प्रसंगी आभार व्यक्त केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .